सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!


# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६० | सोमवार, दि. २ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





**मकसुद हुसैन बोहरी**
व्यापारी/ सामाजिक कार्यकर्ता



**श्री. प्रशांत सोनवणे**
अधिक्षक अभियंता



**श्री. शेखर साने**
ख्यातनाम चित्रकार



**श्री. हरिष पाटील**
अमळनेर



**श्री. जयवंत पाटील**
अमळनेर

## आरडाओरड, पळापळ अन् किंकाळ्या!

# इस्त्रायलच्या हल्ल्यात पीव्ही सिंधू थोडक्यात बचावल्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

इस्रायल आणि अमेरिकेने शनिवारी इराणमधील राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर हल्ला केला अन् जगात मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यामुळे आता ही तिसऱ्या महायुद्धाला सुरूवात तर नाही ना? असा प्रश्न पडू लागला आहे. त्यातच आता इस्रायलच्या हल्ल्यात भारताच्या स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू थोडक्यात बचावल्या आहेत. सोशल मीडियावर त्यांनी याबाबत माहिती दिली आहे.

### सांगितला एअरपोर्टवरचा थरार

**काय म्हणाल्या पीव्ही सिंधू**

काही तासांपूर्वी आम्ही ज्या ठिकाणी थांबलो होतो, त्या अगदी जवळच एक मोठा स्फोट झाला. या स्फोटामुळे सगळीकडे धूर आणि ढिगारा साचला होता. विशेष म्हणजे कोच या धुराच्या आणि ढिगाऱ्याच्या अगदी जवळ होते. त्यामुळे त्यांना तिथून जीवाच्या आकांताने पळावे लागले. हा क्षण सर्वांसाठी अत्यंत तणावाचा आणि भीतीदायक होता, असे पीव्ही सिंधू यांनी म्हटले आहे. सुदैवाने पीव्ही सिंधू आणि त्यांची संपूर्ण टीम आता सुरक्षित आहे. त्यांना अधिक सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. दुबई विमानतळ कर्मचारी आणि तिथल्या स्थानिक प्रशासनाने केलेल्या अथक परिश्रमांमुळे आमचा जीव वाचला, असेही सिंधू यांनी म्हटले आहे. या कठीण काळात दुबईतील इंडियन हायकमिशनने दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आणि सततच्या मदतीबद्दल त्यांनी विशेष आभार मानले आहेत. सध्या ही संपूर्ण टीम या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत. परिस्थिती निवळण्याची आणि सर्व काही सुरळीत होण्याची ते वाट पाहत आहेत. "आम्ही सुरक्षित आहोत आणि आशा सोडून दिलेली नाही," अशा शब्दांत सिंधू यांनी आपल्या चाहत्यांना दिलासा दिला आहे.



# अजितदादा पवारांचा राज्यातील पहिला पुतळा अमळनेर 'कृऊबा'त !

## सभापती अशोक पाटील यांची माहिती

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अमळनेरशी विकासाचे नाते जुळले होते. आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्ष (स्व.) सुरेश ललवाणी यांच्या माध्यमातून अमळनेरच्या विकासाला (स्व.) अजितदादा पवारांनी गती दिली. या मार्च महिन्यातच येथील बाजार समिती आवारात (स्व.) अजितदादा पवारंचा शेतकरी रूपातील पहिला पुतळा उभारला जाईल. त्याचे काम पूर्णत्वास आले आहे. महाराष्ट्रातील हा पहिला पुतळा राहील, अशी माहिती बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांनी रविवार, दि. १ मार्च रोजी दिली. सभापती अशोक पाटील यांनी सांगितले, की आमदार अनिलदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मदतीने तसेच खासदार स्मितताई वाघ, उपसभापती, संचालक मंडळ, व्यापारी, सचिव, कर्मचारी, हमाल, मापाडी व गुमास्ता यांच्या सहकार्याने बाजार समितीने प्रगतीच्या दिशेने झेप घेतली आहे. शिस्त, पारदर्शीपणा यामुळे आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. अमळनेर बाजार समिती जिल्ह्यात अव्वल ठरली आहे. त्यामुळे पणनच्या कर्जाची नियमित परतफेड करण्यात आली. सुपर्व्हिजन फी, अंशदान आदी बाबींच्या नियमिततेमुळे पणनकडून बाजारसमीतीला व्याजाच्या ५ टक्के असा सहा लाखाचा बोनस मिळाला आहे. त्यातून याच मार्च महिन्यात होणाऱ्या सर्वसाधारण सभेत शेतकऱ्यांचा सन्मानही केला जाईल, असेही अशोक पाटील यांनी सांगितले.

### असे असेल अजितदादांचे स्मारक

संपूर्ण महाराष्ट्रात अजितदादांवर प्रेम करणारी जनता आहे. सर्वत्र अजितदादांच्या स्मारकाची मागणी होत आहे. मात्र, येथील बाजार समितीने राज्यात प्रथम बाजी मारली आहे. बाजार समितीच्या प्रवेशद्वारावर चौथऱ्यावर बैलगाडी आणि त्यावर शेतकरी रुपात (स्व.) अजितदादा पवार यांचा पुतळा उभारण्यात येईल. सोबत धान्य कापणारा शेतकरी व धान्याचे पोते उचलणारा शेतकरी असे पुतळे असतील. या स्मारकाची एकूण उंची १५ फूट असेल. (स्व.) अजितदादा पवारांचा पुतळा त्यांच्या उंची एवढाच असेल. हे स्मारक शेतकऱ्यांना आणि अमळनेर तालुक्यातील जनतेला हे प्रेरणा, धाडस आणि ऊर्जा देत राहील.



**विकासकामांचे उदघाटन**

बाजार समितीच्या आवारात १३६ गाळे बांधण्यात येत आहेत. लेखापाल कार्यालय बांधण्यात आले आहे. पातोंडा उपबाजारात वे ब्रिज बांधण्यात आले आहे. बाजार समितीच्या पेट्रोल पंपावर इलेक्ट्रिक वाहनच्या चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले आहे. मारवड उपबाजार समितीत संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. या विकासकामांचेही लवकरच उदघाटन होणार आहे.

**नवीन कामाचे भूमिपूजन**

शेतकरी भुवन, हमाल मापाडी भुवन, व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज २०० फूट शेडचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. आगामी काळात उन्हाळ्यात लिलावसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मोफत शितपेयाची सुविधा करण्यात येईल. हिवाळा किंवा पावसाळ्यात मोफत चहाची सुविधा उपलब्ध असेल.

## पैसे दामदुप्पटच्या आमिषाने अकरा लाखांची फसवणूक

### न्यायालयाचे सात जणांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पैसे दामदुप्पट करण्याच्या नावाखाली अमळनेरच्या केळी व्यापाऱ्याला तब्बल ११ लाखात गंडविणाऱ्या अजिंठा व संभाजीनगर येथील आरोपीविरुद्ध जादू टोणा व फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश अमळनेर न्यायालयाने कलम १७५ (३) प्रमाणे २४ फेब्रुवारी रोजी दिले आहेत.

खटल्याची पार्श्वभूमी : अमळनेर येथील आसिफ छोटू बागवान हे केळी व्यापारी व्यापारनिमित्त नेहमी संभाजीनगर, अजिंठा येथे येत होते. त्यांची ओळख शेख मुजाहिद शेख मुकीत, अकबर मकबूल मेवाती, अब्दुल मुक्कीम अब्दुल खालिफ शेख, प्रकाश गायकवाड, नंदू जाधव, शाहरूख अब्दुल मुकीत, फिरोजखा भिकनखा मेवाती यांच्याशी झाली. त्यांनी आसिफ बागवान याला तुला रक्कम दामदुप्पट करून देतो, असे सांगितले. सुरुवातीला आसिफ याने नकार दिला. मात्र, १७ डिसेंबर २०२२ रोजी त्यांनी त्याला जाळ्यात ओढून त्याच्या घरात पूजा विधी करून पैसे दुप्पट करून देण्याचे ठरवले. आसिफ याने पत्नीचे दागिने विकून ११ लाख रुपये त्यांना आणून दिले. ही पूजा घातक असते. यात जीव जाऊ शकतो, असे म्हणत त्यांनी असिफला घराबाहेर काढले. पूजेच्या नावाखाली खोलीत धूर केला. याचा फायदा घेत एकाने रक्कम जॅकेटच्या आतील खिशात घालून त्याठिकाणी नकली नोटाचे बंडल ठेवले. त्यावर एक एक खरी नोट लावून त्यांनी असिफला त्यावर तांदूळ टाकायला व मंत्र म्हणत रहा, असे सांगितले. त्यांनतर त्यांनी धुळे रोडला सोडायला सांगितले. असिफने नंतर नोटा तपासल्या असता त्या नकली निघाल्या. त्यांनी पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी संबंधित व्यक्तींना पकडून आणल्यानंतर त्यांनी प्रतिज्ञापत्र द्वारे ५ लाख रुपयांची मुकुंदवाडी येथील मालमत्ता आणि ६ लाख रुपयांचा धनादेश लिहून दिला. त्यामुळे गुन्हा दाखल झाला नाही. मात्र, ती मालमत्ता आणि धनादेश दोन्हीही बनावट निघाल्याने आसिफ बागवान यांनी ॲड. सलमान शाह यांच्यामार्फत अमळनेर न्यायालयात याचिका दाखल केली. उपलब्ध पुरावे, कागदपत्र व पोलिसांच्या जबाबावरून न्यायालयाने सात जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत.

## दिनविशेष

०२ मार्च

- जागतिक किशोरवयीन मानसिक आरोग्य दिन
- मुंबईत जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स सुरू झाले.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### डॉ. नानासाहेब धर्माधिकारी जयंती











(छायाचित्रे : मयूर चौधरी)

## अमळनेरात स्वच्छतेतून केला ५ टन कचरा संकलन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त रविवार, दि. १ मार्च रोजी शहरासह तालुक्यात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सुमारे २०० श्री सदस्यांनी यात सहभाग नोंदवला. सुमारे साडेतीन ते चार किलोमीटरचा परिसरात स्वच्छता करण्यात आली.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत महाराणा प्रताप चौकातून स्वच्छता अभियानास सुरूवात झाली. रेल्वे स्थानक परिसर, राणी लक्ष्मीबाई चौकसह विविध भागात स्वच्छता करण्यात आली. सुमारे चार ते पाच टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात आला. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे मार्फत दरवर्षी स्वच्छता अभियान राबविण्यात येते. रक्तदान शिबिर, महाआरोग्य शिबिर आदी उपक्रमी राबविण्यात येतात.

श्री मंगलग्रह मंदिर अमळनेर

सर्व भाविकांना नम्र सूचना

मंगळवार, दि. ०३ मार्च २०२६ रोजी

चंद्रग्रहण असल्यामुळे

दुपारी 12.30 वाजे नंतर

हवनात्मक शांती पूजा व नियमित अभिषेक पूजा होणार नाहीत.

मात्र मंदिरात देवाचे दर्शन, पालखी व महाआरती होईल. कृपया सर्वांनी नोंद घेऊन सहकार्य करावे, ही विनंती.

## संपादकीय

# शिक्षण वाचवा, मराठी शाळा वाचवा !

गेल्या दहा वर्षांत ९३ हजार शाळा बंद होणे, ही बहुजन समाजातील सर्वसामान्य, मध्यमवर्गीय कुटुंबातील पुढील अनेक पिढ्यांचे भवितव्य अंधकारमय करणारी बाब आहे. आपला बहुजन समाज याविरोधात जागा होत नाही ही यापेक्षाही मोठी चिंताजनक गोष्ट आहे. देशातील शिक्षण व्यवस्थेची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. मागील दहा वर्षांत देशभरातील ९३ हजारांहून अधिक शाळा बंद झाल्या आहेत. केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. राजस्थानमधील सीकरचे सीपीआय (एम) खासदार अमराराम यांनी यासंदर्भातील प्रश्न विचारला होता.

सरकारी डेटानुसार २०१४- १५ ते २०१९- २० या सहा वर्षांत देशभरात तब्बल ७० हजारांहून अधिक शाळांवर टाळे लागले. जो आतापर्यंतचा सर्वाधिक आकडा आहे. कोव्हिड काळात आणि त्यानंतरच्या वर्षांत म्हणजे २०२०- २१ ते २०२४- २५ या कालावधीतही सुमारे १८ हजार ७०० पेक्षा जास्त शाळा बंद झाल्या. म्हणजेच वेग थोडा कमी झाला असला, तरी शाळा बंद होण्याची प्रक्रिया पूर्णपणे थांबलेली नाही. उत्तर प्रदेशात सर्वाधिक सुमारे २४ हजार ६०० शाळा बंद झाल्या आहेत. त्यानंतर मध्य प्रदेशात २२ हजार ४०० शाळा बंद करण्यात आल्या. ओडिशात सुमारे ५ हजार ४०० शाळा, झारखंडमध्ये ५ हजारहून अधिक शाळा, राजस्थानमध्ये २ हजार ५०० पेक्षा जास्त शाळा बंद झाल्या आहेत.

महाराष्ट्र, बिहार, पंजाब, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालसारख्या मोठ्या राज्यांत शेकडो ते हजारो शाळा बंद झाल्या आहेत. विशेष म्हणजे पश्चिम बंगालमध्ये एकूण शाळांच्या संख्येत चढ-उतार दिसून आला. असे असले तरी अखेरीस सुमारे एक हजार शाळा कमी झाल्या आहेत. जम्मू-कश्मीरमध्ये सुमारे ४ हजार ४०० शाळा बंद करण्यात आल्या आहेत. याशिवाय ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्येही या कालावधीत एक हजाराहून अधिक शाळांवर परिणाम झाला आहे. महाराष्ट्र आणि हिमाचल प्रदेशातही शेकडो शाळा बंद झाल्याची नोंद आहे.





अमळनेर : राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमापूजन प्रसंगी उपस्थित द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी, शिक्षिका व विद्यार्थिनी. दुसऱ्या छायाचित्रात पी.बी.ए. इंग्लिश स्कूलमधील विज्ञान प्रदर्शनातील उपकरणांची पाहणी करताना मान्यवर.

# द्रौ. रा. कन्या शाळा, पीबीए स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञानदिन

## विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैज्ञानिक उपकरणांनी मिळविली उपस्थितांची दाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित द्रौ. रा. कन्या शाळा व पीबीए इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञानदिन उत्साहात झाला. थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

**द्रौ. रा. कन्या शाळा**

द्रौ. रा. कन्या शाळेत मुख्याध्यापिका सौ. एस. एस. सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होत्या. उपमुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. बाविस्कर, पर्यवेक्षक एस. पी. वाघ, जेष्ठ शिक्षक एस. एस. माळी, श्री. वाघ, शिक्षिका श्रीमती आर. एस. सोनवणे, शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी विज्ञानाचे विविध प्रात्यक्षिके सादर केली. विज्ञान विभागाच्या सौ. एस. एस. कसबे, सौ. तेजस्वी पाटील यांनी मार्गदर्श केले. विद्यार्थिनी कु. यशस्वी शिंगारे हिने सूत्रसंचालन केले. हरित सेना विभागप्रमुख सौ. जोशी यांनी सहकार्य केले.

**'पीबीए' इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन**

पी. बी. ए. इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पहिली ते चौथी एक गट व पाचवी ते नववी दुसरा गट हा तयार करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी देशाला महासत्ता बनविणारे विविध उपकरणांचे सादरीकरण केले. डी. के. पाटील, पी. बी. भराटे, पी. आर. भावसार, निरंजन पेंढारे यांनी परीक्षण केले. शाळा समितीचे चेअरमन डॉ. संदेश गुजराथी, मुख्याध्यापक जे. एस. देवरे, पर्यवेक्षक महेश माळी, पर्यवेक्षिका मीनाक्षी बारी, व्ही. पी. बडवे, व्ही. एस. अमृतकर, व्ही. जी. बोरोले, डिंपल देसाई, स्वाती माळी, योगिशा महाजन, वाय. पी. ओवे, सविता पवार, श्रावण पाटील, प्रशांत वंजारी, अनंत बागल आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# जुनोने शिवारात शेतकऱ्याचा पाण्यात बुडून मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील जुनाने शिवारात शेतकरी दत्तू लोटन पाटील (वय ४०) यांचा मृत्यू झाला आहे. दत्तु पाटील हे रविवार, दि. १ मार्च रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास शेतात जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्यांचे बंधू अरुण लोटन पाटील, आई यमुनाबाई लोटन पाटील, पत्नी सविता दत्तु पाटील तसेच गावातील ओंकार पाटील, योगेश धनगर, अनिल पाटील आदींनी शेतशिवारात शोध घेतला. दरम्यान, दुपारी २ वाजेच्या सुमारास जुनाने शिवारातील रामचंद्र प्रताप पाटील यांच्या शेताजवळील पाटाच्या वाहत्या पाण्यात दत्तू पाटील यांचा मृतदेह आढळून आला. याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हवालदार विजय भाई तपास करीत आहेत.

# टाकरखेड्यातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील टाकरखेडा येथून १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. युवराज भिवसन कोळी यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांची नात वैष्णवी रवींद्र कोळी (वय १५ वर्षे ८ महिने) ही २५ फेब्रुवारीच्या रात्री घरातून बेपत्ता झाली. कुटुंबीयांनी शोध घेतला असता ती आढळून आली नाही. अज्ञात व्यक्तीने तीला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महेश्वर (मध्य प्रदेश) : राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या राजवाड्याला भेट दिल्याप्रसंगी उपस्थित भुगोल विभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक आदी.

# प्रतापच्या भूगोल विभागाचा अभ्यासदौरा

## महेश्वर, मांडवगड येथे विद्यार्थ्यांनी घेतली भौगोलिक माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय भौगोलिक अभ्यास दौरा आयोजीत करण्यात आला होता. या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र-मध्य प्रदेश सिमेवरील बिजासनी, मध्यप्रदेशातील महेश्वर, मांडवगड या ऐतिहासिक स्थळांना भेटी देवून इतिहासाची माहिती जाणून घेतली. दौऱ्यात बी.ए. आणि एम.ए.च्या एकूण ३५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

अभ्यास दौऱ्याची सुरुवात महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवरील बिजासनी माता मंदिर येथे दर्शन व स्थळ परिचयाने करण्यात आली. हे मंदिर सातपुडाच्या उंच डोंगर रांगेवर वसलेले आहे. परिसरातील भौगोलिक रचना, उंची, उतार, वनस्पती आच्छादन तसेच स्थानिक वसाहतींची मांडणी यांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. सातपुडा डोंगराळ प्रदेशातील धार्मिक स्थळांची स्थाननिश्चिती व त्यामागील भौगोलिक माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी महेश्वर येथे भेट दिली. नर्मदा नदीच्या काठी वसलेले हे ऐतिहासिक शहर भौगोलिक व सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा किल्ला, राजवाडा, निवासस्थान, महादेव मंदिर तसेच नर्मदा नदीवरील घाट व त्यांचा पुतळ्याची पाहणी केली. नर्मदा नदीच्या प्रवाहाची दिशा, घाटांची रचना, पूररेषा, नदीकाठावरील वस्तीची मांडणी व जलस्रोतांचा वापर या सर्व बाबींचे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले. त्यानंर विद्यार्थ्यांनी मांडवगड (मांडू) येथे भेट देऊन तेथील पठारी प्रदेशावरील वसाहतींची रचना, नैसर्गिक तटबंदी, उंचसखल भूभाग, प्राचीन जलसंधारण पद्धती व जलव्यवस्थापन प्रणाली आणि ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास केला. राणी रूपमती महाल, जहाज महाल, जल महाल व हिंडोला महाल या वास्तूंचे ऐतिहासिक तसेच भौगोलिक महत्त्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले.

प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. मुकेश भोळे, विभागप्रमुख डॉ. कैलास निळे, डॉ. किरण गावित व डॉ. प्रमोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासदौरा पार पडला. सहल प्रमुख डॉ. महेंद्र महाजन, प्रा. भुषण पवार, प्रा. अमित शिरसाठ, प्रा. चंद्रशेखर वाढे, प्रा. चंद्रकांत जाधव व प्रा. प्रितम पावरा यांनी विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेतला.

# इतिहासातील सर्वात मोठे घबाड, नोटा मोजण्याच्या मशिनही थकल्या!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ओरिसा दक्षता विभागाने कटक मंडळाचे खाण उपसंचालक देबब्रत मोहंती यांना ३० हजार रुपयांची लाच घेताना अटक केली. त्यानंतर भुवनेश्वरमधील त्यांच्या फ्लॅटमधून ४ कोटींहून अधिक रोख रक्कम जप्त केली. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी रोख जप्ती आहे. नोटा मोजण्यासाठी मशिनही थकल्याइतकी मोठी रक्कम सापडली.

या कारवाईची मुख्य वैशिष्ट्ये

लाच : खाण उपसंचालक देबब्रत मोहंती यांनी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारली होती.

रोख रक्कम : भुवनेश्वरच्या पटिया भागातील त्यांच्या भाड्याच्या घरातून आणि इतर ठिकाणांहून सुमारे ४. २७ कोटी रोख जप्त.

इतर मालमत्ता : १३० ग्रॅम सोने आणि भुवनेश्वरमध्ये एका दोन मजली इमारतीची नोंद.

कारवाई : मोहंती यांना कटक मंडळातून रंगेहात पकडल्यानंतर ही छापेमारी करण्यात आली. ही रक्कम इतकी जास्त होती की नोटा मोजणीच्या मशीनही थकल्याची माहिती समोर आली आहे. ज्यामुळे या घटनेने खळबळ उडवून दिली आहे.



## इराण- इस्त्रायल युद्धाचा भडका

# सोन्या- चांदीचा भाव कडाडला

## सोन्याच्या दरात ११ हजारांची वाढ, तर चांदी तीन लाखांच्या पार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत तणाव आता अधिक तीव्र झाला आहे. अशातच या संघर्षाचा विस्तार झाल्यास त्याचे परिणाम संपूर्ण मध्यपूर्वेत जाणवू शकतात.

इराणने प्रत्युत्तरादाखल काही देशांमधील अमेरिकेंच्या बेसवरती हल्ले केल्याचे वृत्त समोर आले आहे. परिस्थिती अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. याचा थेट परिणाम भारतावरही पुढील काही दिवसांत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर अवघ्या काही तासातच सोन्याच्या आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, गेल्या काही महिन्यापासून रशिया- युक्रेन युद्धाचा परिणाम म्हणून सोन्याच्या आणि चांदीच्या दरात मोठी



वाढ झाल्यानंतर त्यात मागील महिन्यात मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळाले होते. मात्र, शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्याच्या नंतर गुंतवणूकदार हे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याच्या आणि चांदीच्या खरेदीकडे वळल्याने सोन्याच्या आणि चांदीच्या मागणीत वाढ झाल्याचे चित्र आहे.

अशातच वाढती मागणी आणि गुंतवणुकीच्या अनुषंगाने सोन्या- चांदीची खरेदी होऊन केली जात असताना सोन्याच्या दरात अकरा हजार रुपयांनी वाढून ते १, ७५, ५०० पोहचले आहे. चांदीचे दर पंचवीस हजार रुपयांनी वाढ होऊन ते ३ लाख ३ हजारांवर जाऊन पोहोचले आहेत, ही वाढ युद्धाची ठिणगी पडताच अवघ्या काही तासातच झाल्याचे पाहायला मिळत आहे. युद्धजन्य परिस्थिती लांबल्यास अजूनही सोन्याचे आणि चांदीचे वाढू शकतात, असा अंदाज सुवर्ण व्यावसिकांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, अचानक रित्या सोन्याच्या आणि चांदीच्या दरात झालेल्या दरवाढीने सर्वसामान्य ग्राहकांच्या बजेटमधे बिघाड झाल्याचे चित्र आहे. तर ग्राहकांनी नाराजीही व्यक्त केली असून सरकारने सोने- चांदीचे दर स्थिर राहतील यासाठी प्रयत्न करायला हवे, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

### *रविवारी सोन्याचा भाव किती ?*

*दिल्लीमध्ये २४ कॅरेट सोन्याचा भाव १७, ३२३ रुपये, २२ कॅरेट सोन्याचा भाव १५, ८८० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याचा भाव १२, ९९६ रुपये प्रति ग्रॅम आहे. मुंबई, हैदराबाद, केरळ आणि पुणे यासारख्या शहरांमध्ये २४ कॅरेट सोन्याचा भाव १७, ३०८ रुपये आहे. त्याचप्रमाणे २२ आणि १८ कॅरेट सोन्याचा भाव अनुक्रमे १५, ८६५ रुपये आणि १२, ९८१ रुपये प्रति ग्रॅम आहे. चेन्नईमध्ये २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति ग्रॅम १७, २०९ रुपये आहे. येथे २२ कॅरेट सोन्याचा भाव १५, ७७५ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याचा भाव १३, ५०० रुपये आहे.याचा अर्थ असा आहे, की शनिवारच्या तुलनेत रविवारी सोने महाग झाले. एका दिवसात २४ कॅरेट सोन्याच्या किमतीत प्रति १० ग्रॅम ४, ३७० रुपयांची वाढ झाली आहे.*

सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

ग्लोबल महातेज

**दि रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर सेंट्रल १९५७ नियम क्र. ८ अन्वये फॉर्म नं. ४**
**दैनिक ग्लोबल महातेज वृत्तपत्राची मालकी व इतर तपशिलासंबंधी**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | : प्लॉट नं. ५१/५२ सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र)- ४२५४०१ |
| २) प्रकाशनाचा प्रसिद्धी काळ | : दररोज |
| ३) प्रकाशकाचे नाव | : श्री. आनंद डिगंबर महाले |
| ४) मुद्रकाचे नाव | : अविष्कार ग्राफीक्स, प्लॉट नं. १७, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) पिन कोड नं. ४२५००२ |
| ५) संपादकाचे नाव | : आनंद डिगंबर महाले |
| ६) राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| ७) पत्ता | : सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र)- ४२५४०१ |
| ८) कार्यकारी संपादक | : श्री. भरत रघुनाथ पाटील |
| ९) पत्ता | : फ्लॅट नं. ३, साईस्नेह अपार्टमेंट, श्री समर्थ नारायण हॉस्पीटल जवळ, जी.टी.पी. बस स्टॉप, देवपूर, धुळे-४२४००५ |
| १०) मालकाचे नाव | : श्री. आनंद डिगंबर महाले |

मी श्री. आनंद डिगंबर महाले असे जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

दि. १ मार्च २०२६ रोजी स्वाक्षरीत
**श्री. आनंद डिगंबर महाले**
प्रकाशकाची सही

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ९ घंटे की प्राइवेट जॉब करते हुए आयएएस बन सकते हैं

## बिहार की बेटी ने साबित किया, ये था गोल्डन रूल

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस का रुतबा, सम्मान और देश सेवा... इन चीजों की वजह से लाखों युवा यूपीएससी की सिविल सेवा परीक्षा पास करने का सपना देखते हैं। यूपीएससी एग्जाम को लेकर यह सोच बन गई है कि इसे क्रैक करना है तो बाकी जिंदगी भूलनी होगी, रोजाना १० से १२ घंटे देने पड़ेंगे। लेकिन बिहार की बेटी श्वेता भारती ने इस सोच को तोड़ने का काम किया है। उन्होंने रोजाना ९ घंटे की प्राइवेट जॉब के साथ न सिर्फ यूपीएससी एग्जाम क्रैक किया, बल्कि आयएएस बनीं। श्वेता की सक्सेस स्टोरी उन युवाओं के लिए उदाहरण हैं जो प्राइवेट जॉब के चलते सिविल सेवा में जाने का सपना छोड़ देते हैं।इंजीनियरिंग के बाद चुना था यूपीएससी का रास्ताश्वेता भारती, बिहार के नालंजा जिले की रहने वाली हैं। साधारण परिवार से आने वाले श्वेता की स्कूलिंग पटना का ईशान इंटरनेशनल पब्लिक स्कूल से हुई है। इसके बाद उन्होंने इंजीनियरिंग में करियर बनाने की ठानी।

भागलपुर इंजीनियरिंग कॉलेज से इलेक्ट्रिकल एंड टेलीकम्युनिकेशनंस इंजीनियरिंग में बैचलर डिग्री हासिल की। लेकिन किस्मत को कुछ और ही मंजूर था।परिवार की जिम्मेदारी या सिविल सेवा का सपना? दोनों चुनेइंजीनियरिंग करने के बाद, श्वेता दुविधा में थीं। एक तरफ परिवार की जिम्मेदारी और दूसरी तरफ सिविल सेवा में जाने का सपना। उस वक्त उन्होंने सबसे कठिन फैसला लिया, जिसने उनकी पूरी जिंदगी बदल दी। उन्होंने विप्रो की नौकरी चुनी ताकि परिवार की जिम्मेदारी उठा सकें, लेकिन सिविल सेवा में जाने का सपना भी नहीं छोड़ा।दिन में प्राइवेट जॉब और रात को यूपीएससी की तैयारीदृढ़ संकल्प और हार न मानने की जिद ही थी जिसने श्वेता को अपना सपना पूरा करने का हौसला दिया। वे दिन में ९ घंटे की प्राइवेट जॉब और रात में घर आकर यूपीएससी सिविल सेवा परीक्षा की तैयारी करती थीं। हालांकि जॉब के साथ प्रिपरेशन के लिए टाइम निकालना आसान नहीं था। फिर भी उन्होंने उम्मीद नहीं छोड़ी।

पहले अटेंप्ट में क्रैक किया यूपीएससी सीएसई एग्जामसंघर्ष के बादल छटे और कामयाबी की सुबह हुई। यूपीएससी सिविल सेवा परीक्षा २०२१ में श्वेता भारती ने ३५६ वीं रैंक हासिल की। नालंदा जिले के छोटे से गांव से आने वाली श्वेता अब एक आयएएस अधिकारी थीं। उन्होंने पहले अटेंप्ट में यह सफलता हासिल की थी। वर्तमान में आईएएस श्वेता गृह राज्य के भागलपुर में असिस्टेंट कलेक्टर पद पर तैनात हैं। आयएएस श्वेता भारती की सक्सेस का गोल्डन रूलप्राइवेट जॉब के साथ यूपीएससी एग्जाम की प्रिपरेशन करना आसान नहीं था। लेकिन श्वेता के एक गोल्डन रूल ने उनकी काफी मदद की, वो सोशल मीडिया से दूरी। एक इंटरव्यू में उन्होंने इसका जिक्र करते हुए कहा था कि उन्होंने सोशल मीडिया और ऑनलाइन वॉट्सएप ग्रुप्स से दूरी बना ली थी। कुछ समय के लिए स्मार्टफोन का इस्तेमाल भी बंद कर दिया। इससे जो समय मिला वो प्रिपरेशन में लगा दिया। श्वेता की जर्नी दृढ़ निश्चय, हार न मानने की जिद और संघर्ष की मिसाल है



# मालदीवला जाण्याची गरज नाही

## महाराष्ट्रातील या ठिकाणी घ्या मिनी मालदीवचा आनंद, खर्चही सर्वांत कमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बजेट कमी आहे आणि मालदीवला जायचे आहे तर मग ही बातमी तुमच्यासाठी. या ठिकाणी घ्या मिनी मालदीवचा आनंद. निसर्गरम्य वातावरण आणि निळसर समुद्र. सध्या अनेक जण सुटीसाठी मालदीवला जाण्याचा प्लॅन करतात. पण खर्च मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अनेक जण जाणे टाळतात. पण तुम्ही सर्वांत स्वस्तामध्ये मालदीवचा आनंद घेऊ शकता.

आज आापल्याला सर्वांत कमी खर्चात मालदीवचा आनंद अनुभवायचा असेल तर महाराष्ट्रातील एका ठिकाणाबद्दल सांगणार आहोत. जेथे गेल्यावर मालदीवसारखा नजारा आहे. आपण कोकणातील तारकर्ली बीचबद्दल बोलत आहोत. या बीचवरील पाणी निळ्या रंगाचे असल्यामुळे आणि कमी गर्दी आणि तेथील सौंदर्य हे मालदीवप्रमाणे असल्याने अनेक लोक येथे येतात. तारकर्ली बीच कोकणातील सुंदर आणि स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे. येथे वेगवेगळ्या प्रकारचे मासे तुम्हाला बघायला मिळतात. त्यासोबत आपण येथे बोटिंगसह सूर्योदय आणि सूर्यास्त व्यवस्थित पाहू शकता. शांत आणि कमी गर्दी असणारे हे ठिकाण कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी एकदम खास आहे.



# रिंकू सिंह टीम इंडियामध्ये सामील होण्यापूर्वी भावूक..!

## नातेवाईकांना म्हणाले 'आईची काळजी घ्या...!!'



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीम इंडियाचा खेळाडू रिंकू सिंह यांना टी २० वर्ल्ड कप २०२६ दरम्यान वडिलांचे निधन झाल्यामुळे अचानक घरी परतावे लागले होते. अंत्यसंस्कारानंतर आता ते वेस्ट इंडिजविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी पुन्हा टीम इंडियामध्ये सामील होण्यासाठी कोलकात्याकडे रवाना झाले होते. जाताना 'आईची काळजी घ्या', असे नातेवाईकांना सांगत त्यांचे अश्रू अनावर झाले होते.

टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये टीम इंडियाला सुपर-८ मधील शेवटचा सामना रविवार, दि. १ मार्च रोजी कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियममध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध खेळला गेला. या सामन्यासाठी टीम इंडियाच्या संघात असलेले रिंकू सिंह झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यानंतर वडिलांच्या निधनामुळे घरी परतले होते. आता ते पुन्हा संघात सामील होण्यासाठी सामील झाले. वडिलांच्या उत्तरकार्यासाठी रिंकू पुन्हा घरी परततील, असे सांगितले जात आहे.

# निरोगी जगण्यासाठी काय खावे?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौष्टिक आहार घेतल्याने शरिरात कोणत्याही पोषक तत्त्वांची कमी होत नाही. तसेच डायबिटीस, स्ट्रोक आणि हृदयरोगांचा आजारही टाळला जातो. जर आहार पौष्टिक नसेल आणि लाइफस्टाईल सक्रिय नसेल तर अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागतो. आहारासंबंधी काय खावे आणि काय खाऊ नये याबाबत माहिती जाणून घेऊया.

आहारात फळे, भाज्या, डाळी, ड्राय फ्रूट्स आणि कडधान्यांचा समावेश केला पाहिजे. आहारात रोज भाज्यांचा समावेश करावा. ताजी फळे किंवा ताज्या हिरव्या कच्च्या भाज्यांना स्नॅक्स म्हणून खाल्ले पाहिजे. जी सीझनल फळे किंवा भाज्या असतात त्यांचा आहारात समावेश केला पाहिजे. यामधून शरिराला अनेक पोषक तत्त्व मिळतात. दिवसभर सामान्यपणे एक चमचा मिठाचे सेवन केले पाहिजे. ज्या मिठाचे सेवन करत असाल ते आयोडाइज्ड असले पाहिजे. जास्त मीठ खाऊ नये. आहारात ट्रान्स फॅट्सचा समावेश करणे टाळले पाहिजे. ट्रान्स फॅट मीट, बेक्ड, तळलेले पदार्थ, पॅक्ड फूड मध्ये असते. याने हृदयरोगाचा धोका खूप वाढतो.

ज्या गोष्टी उकडून आणि स्टीम करून खाल्ल्या जाऊ शकतात त्या फ्राय करून खाणे टाळले पाहिजे. लोणी आणि तूपाऐवजी पॉलीसॅच्युरेटेड फॅट्स असलेल्या तेलाचा वापर करता येऊ शकतो. जसे- सोयाबीन, कॉर्न आणि सूर्यफूलाचे तेल. फास्ट फूड, जंक फूड, डोनट, बर्गर, पिझ्झा यांचे सेवन कमी केले पाहिजे. या पदार्थांमुळे हृदयरोग, डायबिटीसचा धोका जास्त असतो. कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोकाही जास्त असतो. जास्त प्रमाणात शुगरचे सेवन केल्याने डायबिटीस आणि लठ्ठपणाचा धोका खूप जास्त वाढतो. शुगरचे सेवन कमी करण्यावर भर दिला पाहिजे. कार्बोनेटेड ड्रिंक्स, स्पॉर्ट्स ड्रिंक्स, रेडी टू ड्रिंक चहा आणि फ्लेवर्ड मिल्कमध्ये शुगर जास्त असते.

# टपालवाहक




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पोस्टमन हा इंग्रजी शब्द असून त्यास मराठीत टपालवाहक, असे म्हटले जाते. पण मराठीत पोस्टमन हाच शब्द प्रचलित आहे. आम्ही लहान असताना दररोज पोस्टमन काका यायचे. इमारतीतील ज्याचे पत्र असेल त्याच्या घरी नेऊन द्यायचे. आमच्या भागात तीन मजली पाचशेवर इमारती आहेत. एका भागासाठी एक पोस्टमन नियुक्त केला जात असे. तो पन्नास इमारतींचे पत्र, पार्सल बघत असे. ते आम्हाला इमारत क्रमांक व आडनावानिशी ओळखत. आई-बाबांबरोबर बजारात किंवा बाहेर कुठे भेटलो तरी नमस्कार करत.


पत्र दिल्यानंतर गृहिणी किंवा आम्ही मुले पोस्टमन काकांना पाणी विचारत असू, चहा तयार असल्यास चहा देत असू, कधी कोण खायलाही देत असत, त्यांनाही बरे वाटे. पत्र, पार्सल वाटून संपली असतील आणि त्यांना वेळ असेल तर थोडावेळ बोलत. मुले दिसली नाहीत की आवर्जून विचारत, की मुले दिसत नाहीत. ती कुठे गेली? कोण आजारी असेल तर दोन दिवसांनी विचारत 'काय आता तब्येत कशी आहे' ? काळजी घ्या. सर्व लोक पोस्टमनशी आपलेपणाने संवाद साधत. प्रत्येकाला तो आपल्या घरातला सदस्यच वाटे. पोस्टमनही तेवढ्याच आपुलकीने सर्वांशी बोलत असे. भावनिक ओलावा, माणुसकी जपणारा तो काळ होता. नंतर टपालपेटी प्रत्येक इमारतीच्या तळमजल्यावर बसवली गेली आणि घरोघरी पत्र पोहोचविण्याचा शिरस्ता बंद झाला. पोस्टमनचे प्रत्येक इमारतीतील जिने चढ-उतार करण्याचे कष्ट वाचले. पण नातेही हळूहळू संपुष्टात आले. हल्ली बहुतेक सर्व कामे, बोलणे ई-मेल, व्हॉट्सॲप, भ्रमणध्वनी यावर काही सेकंदात होत असल्याकारणाने पोस्टमन दिसणे दुरापास्त झाले आहे.

# तोळे नाही, तब्बल इतक्या किलोमध्ये बनले रश्मिका-विजयच्या लग्नाचे दागिने..!

## तीनशे दिवस चालले काम, खर्च ऐकून डोळे विस्फारतील...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उदयपूरमध्ये २६ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या रश्मिका- विजयच्या लग्न सोहळ्यात दोघांच्या वेडिंग लूकने सर्वांना भुरळ घातली. मात्र, सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते म्हणजे त्यांनी परिधान केलेल्या सोन्याच्या दागिन्यांनी. दाक्षिणात्य सुपरस्टार विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांच्या शाही विवाहाचे फोटो सध्या इंटरनेटवर वणव्यासारखे पसरले आहेत. हे दागिने केवळ त्यांच्या पेहरावाचा भाग नव्हते, तर त्यामागे १० महिन्यांची मेहनत आणि किलोने सोने वापरण्यात आले होते. हैदराबादमधील एका नामांकित ज्वेलरी ब्रँडने या दागिन्यांची गुपिते उघड केली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार हे दागिने तयार करण्यासाठी तब्बल १० महिने म्हणजेच जवळपास ३०० दिवस लागले. प्रत्येक डिझाइन आधी कागदावर रेखाटले गेले. त्यानंतर त्यावर बारकाईने विचार करून कस्टमायझेशन करण्यात आले.



हे दागिने बनवण्यासाठी 'दीप नक्षी' आणि 'रवा' या पारंपरिक दाक्षिणात्य कलाकुसरीचा वापर करण्यात आला आहे. त्यांना अँटिक मॅट फिनिश देण्यात आला होता. जेणेकरून ते शेकडो वर्षांपासून खानदानात चालत आल्यासारखे हेरिटेज दिसावेत.

सहसा लग्नात नवरीच्या दागिन्यांची चर्चा असते. मात्र, विजय देवरकोंडानेही आपल्या दागिन्यांनी ट्रेंड सेट केला आहे. विजयच्या दागिन्यांची थीम रॉयल होती. त्याच्या दागिन्यांवर हत्ती (बुद्धिमत्तेचे प्रतीक) आणि वाघ (चपळतेचे प्रतीक) कोरलेले होते. त्याने गळ्यात जड कासू माळ, कानात कडुक्कन (सोनेरी कुंडल), हातात कडे आणि कमरेला सोन्याचा पट्टा परिधान केला होता.

रश्मिकाला एखाद्या देवीसारखा लूक देण्यात आला होता. तिच्या दागिन्यांमध्ये एकूण ११ खास पीसेस होते. यात चोकर, मोठे झुमके, माथापट्टी, नथ, कंबरपट्टा आणि बाजूबंद यांचा समावेश होता.

सूत्रांच्या माहितीनुसार, या दोघांच्या दागिन्यांचे वजन तोळ्यात मोजण्यापलीकडे होते. अनेक किलो सोन्याचा वापर या भव्य ज्वेलरीसाठी करण्यात आला आहे.

रश्मिकाच्या कोडावा साडीवर हे किलोने मोजले जाणारे दागिने तिच्या सौंदर्याला एक वेगळीच उंची देत होते. विजयच्या गळ्यातील हारांची आणि रश्मिकाच्या ११ पीसेसच्या सेटची किंमत कोटींच्या घरात असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# होळी : भक्ती, श्रद्धा आणि अंतर्मन शुद्धीचा पवित्र उत्सव!


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळवार, दि. ३ मार्च रोजी साजरी होणारी होळी हा केवळ रंगांचा सण नसून तो आध्यात्मिक जागृती, भक्ती आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचा दिव्य संदेश देणारा उत्सव आहे. हिंदू पंचांगानुसार फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी केली जाते. या दिवशी भक्ती, श्रद्धा आणि सत्य यांचा विजय साजरा केला जातो.

होळीचा संबंध प्रामुख्याने भक्त प्रल्हाद आणि राक्षसी होलिका यांच्या कथेशी जोडला जातो. हिरण्यकश्यपू हा अहंकारी राक्षस स्वतःलाच देव मानत होता. त्याने आपल्या राज्यात विष्णूभक्ती करण्यास मनाई केली होती. मात्र, त्याचा पुत्र प्रल्हाद हा परमेश्वराचा अखंड भक्त होता. त्याच्या या भक्तीमुळे संतप्त झालेल्या हिरण्यकश्यपूने त्याला अनेक यातना दिल्या. अखेरीस होलिकेच्या मदतीने त्याला अग्नीत बसविण्याचा कट रचला.

होलिकेला अग्नीपासून न जळण्याचा वर होता. मात्र, देवभक्त प्रल्हादाच्या श्रद्धेच्या सामर्थ्यामुळे होलिका जळून भस्मसात झाली आणि प्रल्हाद सुरक्षित राहिला. यावरून हे स्पष्ट होते की, अहंकार, दुष्टता आणि अन्याय कितीही बलवान असले तरी श्रद्धा, भक्ती आणि सत्य यांचा विजय अटळ असतो. म्हणूनच होळी हा 'असत्यावर सत्याचा विजय' दर्शविणारा पवित्र सण आहे.

होळीच्या आदल्या दिवशी होलिका दहन केले जाते. या



अग्नीत आपल्या मनातील मत्सर, द्वेष, क्रोध, अहंकार आणि नकारात्मक विचार अर्पण करण्याची परंपरा आहे. प्रत्यक्षात होलिका दहन म्हणजे बाह्य अग्नीपेक्षा अंतर्मनातील विकार जाळण्याची आध्यात्मिक प्रक्रिया होय. या दिवशी आपण मन शुद्ध करून नवीन सुरुवात करण्याचा संकल्प करतो.

होळी हा सण भगवान श्रीकृष्ण यांच्या लीलांशीही जोडला जातो. वृंदावन आणि मथुरा येथे श्रीकृष्णाने गोप-गोपिकांसोबत रंगांची उधळण केली, असे पुराणांमध्ये वर्णन आहे. रंगोत्सव म्हणजे प्रेम, मैत्री आणि बंधुभाव यांचे प्रतीक. रंगांच्या माध्यमातून समाजातील भेदभाव विसरून सर्वजण एकत्र येतात.

यंदा ३ मार्च रोजी मंगळवारी होळी साजरी होत आहे. मंगळवार हा हनुमान भक्तांसाठी विशेष मानला जातो. या दिवशी भक्तगण हनुमान यांची पूजा करतात. होळीच्या पवित्र अग्नीसमोर हनुमान स्तोत्र, सुंदरकांड किंवा रामनाम जप केल्यास मनोबल, धैर्य आणि सकारात्मक ऊर्जा वाढते, असे मानले जाते.

होळी आपल्याला सामाजिक एकात्मतेचा संदेश देते. समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. कोणताही भेदभाव न करता एकमेकांना रंग लावून आनंद व्यक्त करतात. आध्यात्मिक दृष्टीने पाहता, प्रत्येक रंगाचेही एक महत्त्व आहे लाल रंग उत्साह व शक्तीचे प्रतीक, हिरवा रंग समृद्धीचा, पिवळा रंग आनंदाचा आणि निळा रंग शांततेचा संदेश देतो.

आजच्या धावपळीच्या जीवनात मनात साचलेले तणाव, कटुता आणि नकारात्मकता दूर करण्यासाठी होळी हा सण एक सुंदर संधी देतो. आपणही या होळीच्या पवित्र निमित्ताने मनातील राग-द्वेष जाळून टाकू या आणि प्रेम, क्षमा, सहकार्य व सद्भावना या गुणांनी जीवन रंगवू या. होळी हा केवळ बाह्य रंगांचा उत्सव नसून अंतःकरण रंगविण्याचा सण आहे. भक्त प्रल्हादाप्रमाणे अढळ श्रद्धा, श्रीकृष्णाप्रमाणे प्रेमभाव आणि हनुमानाप्रमाणे निष्ठा आपल्या जीवनात रुजली तर प्रत्येक दिवस होळीप्रमाणे आनंददायी होईल.

# रहस्य महादेवाच्या पिंडीचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान महादेवाचे भक्त श्रावणाबरोबरच वर्षभर शिवपूजा करत असतात. पूजेसाठी पिंडी कशी असावी, पूजेत कोणते साहित्य वापरावे व कोणते वापरू नये याला आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्व आहे.

**देवघरातील पिंडी**

- घरातील देवघरात महादेवाची पिंडी ठेवावी, मूर्ती नको.
- देवघरातील पिंडीवर नाग नसावा.
- पिंडी साधी दगडी असली तरी चालते, मात्र शक्यतो पितळेची असावी.
- देवघरातील पिंडी तीन इंचांपेक्षा मोठी असू नये, ती तीन इंचांपेक्षा छोटी असावी.

भगवान महादेव हे देवाधिदेव असून हे न्यायप्रिय दैवत आहे आणि त्यांचे सर्व प्रकारचे भक्त आहेत. जसे देव, दानव, यक्ष, किन्नर, भूत, प्रेत, पिशाच, आणि इतरही अनेक योनीजीव महादेवास भजतात. जेथे महादेवाची मूर्ती/चित्र असते तेथे त्यांचे सर्व भक्त उपस्थित होतात.

जोतिर्लिंगांच्या ठिकाणी तथा महादेवाच्या पिंडीला संपूर्ण गोल प्रदक्षिणा करीत नाहीत, तर अर्धी प्रदक्षिणा करून नमस्कार करतात कारण उत्तर दिशेला वरील सर्व भक्त अदृश्य रूपाने उपस्थित असतात, तथा उत्तर दिशेने महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक घातलेले पाणी तीर्थरूपाने वाहत असते, ते ओलांडून गेल्याचे पातक लागते.

महादेवाची मूर्ती फक्त स्मशानात असते, देवघरात महादेवाची मूर्ती नसावी. मानवाला पिंडीपूजन सांगितले आहे म्हणूनच संपूर्ण भारतात महादेवाच्या मुख्य शक्तिपीठांवर महादेवाची पिंडी लिंगरूपाने स्थापन केलेली समजते.

बारा ज्योतिर्लिंगे ही लिंगे म्हणजेच पिंडीरूपाने आहेत, यातून संपूर्ण विश्वाला वैश्विक ऊर्जा मिळते. महादेवाला नित्य शुद्ध पाण्यासह रुद्रसूक्त पठण करीत जलाभिषेक करावा. महादेवाला जल अतिप्रिय आहे. एखाद्याने महादेवास जल अर्पण केल्यास ते त्यावर खूप प्रसन्न होतात. महादेवाला मनापासून मोठ्या संख्येने एकत्र येऊन सामुदायिक जलरुद्राभिषेक केल्यास विपुल पर्जन्यमान राहते.

गुरुचरित्रात म्हटले आहे, की नित्याच्या रुद्राभिषेकाने दीर्घायुष्य, आरोग्य मिळते आणि अकाली मृत्यू टळतो.

श्रीमद्भागवतात म्हटले आहे, की महादेवाची नित्य नियमित रुद्राभिषेकाने सेवा केल्यास घरी अखंड लक्ष्मी वास करते आणि त्या भक्तांच्या घरी अखंड श्रिया राहते आणि सर्व सुखसमृद्धी वाढून सर्वत्र कीर्ती पसरते.

भगवान शंकराविषयी थोडी काळजी बाळगण्याची गरज असते. उत्साहाच्या भरात काही चुकीच्या गोष्टी आपल्या हातून घडत तर नाहीत ना, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

खालील सात वस्तू भगवान शंकराला कधीही अर्पण करू नका. का? तर जाणून घ्या.

१. शंख शिवपुराणानुसार भगवान शंकराने शंखचूड नावाच्या असुराचा वध केला होता. तो भगवान विष्णूचा भक्त असल्याने त्याची आणि लक्ष्मीची शंखाने पूजा केली जाते.

२. हळद-कुंकू भगवान शंकर आजन्म वैरागी होते. त्यामुळे शृंगाराशी संबंधी कोणतीही वस्तू त्यांना अर्पण केली जात नाही. हळदीलाही सौंदर्यवर्धक मानले जाते. त्यामुळेच हळद किंवा कुंकू भगवान शंकराला अर्पण केले जात नाही. या गोष्टी भगवान विष्णूला अर्पण केल्या जातात.

३. तुळशीपत्र असुरांचा राजा जलंधर याच्याविषयी असलेल्या एका कथेनुसार त्याची पत्नी वृंदा तुळशीचे रोपटे बनून गेली होती. भगवान शंकरांनी जलंधराचा वध केला होता. त्यामुळे भगवान शंकराच्या पूजेत तुळशीपत्र न वापरण्याचा पण वृंदाने केला होता.

४. नारळपाणी नारळाच्या पाण्याचा भगवान शंकरावर अभिषेक केला जात नाही. नारळाला लक्ष्मीचे रूप मानले जाते. म्हणून शुभकार्यात नारळाचा वापर करून त्याचा प्रसाद म्हणून वापर केला जातो. पण, भगवान शंकराला अर्पण केलेले पाणी निर्माल्य होते.

५. उकळलेले दूध उकळलेले दूध किंवा बाजारात मिळणारे पॅकेटमधील दूध कधीही भगवान शंकराला अर्पण करू नये. त्यापेक्षा गंगाजलाने अभिषेक करा. बाजारात मिळणारे पॅकेटमधील दूधही उकळलेले असते. त्यामुळेच त्याचा वापर करणेही टाळावे.

६. केवड्याचे फूल भगवान शिवाच्या पूजेत केवड्याचे फूल वर्जित आहे. शिवपुराणानुसार ब्रह्मदेव आणि विष्णूच्या वादात खोटे बोलल्यामुळे केवड्याला भगवान शंकराने शाप दिला होता.

७. कुंकू किंवा शेंदूर कुंकू किंवा शेंदुराचा वापरही भगवान शंकराची पूजा करण्यात वर्ज्य केला आहे.

**॥ ॐ नमः शिवाय॥**

# सातशे पंचेचाळीस श्लोकांचे महाभारत अन् ग्रंथ फक्त नऊ ओळींत समजून घ्या



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही कोणत्याही धर्माचे असलात, तुम्ही पुरुष असलात किंवा स्त्री, तुम्ही गरीब असलात किंवा श्रीमंत, तुम्ही आपल्या देशात असलात किंवा परदेशात थोडक्यात, तुम्ही माणूस असाल, तर महाभारतातील या "नऊ अमूल्य मोत्या" अवश्य वाचा व समजून घ्या :

१. तुमच्या मुलांच्या अविचारी मागण्या आणि इच्छा योग्य वेळी रोखल्या नाहीत, तर आयुष्यात तुम्ही असहाय्य होता "कौरव"

२. तुम्ही कितीही शक्तिशाली असलात, परंतु अन्यायाचा पाठिंबा दिलात तर तुमची शक्ती, शस्त्रे, कौशल्य आणि आशीर्वाद कोणतेही उपयोगी पडत नाहीत "कर्ण"

३. मुलांना त्यांच्या बुद्धीचा गैरवापर करून विनाश घडविण्याइतके महत्त्वाकांक्षी बनवू नका "अश्वत्थामा"

४. अधर्मी लोकांना कधीच संरक्षण देण्याचे वचन देऊ नका "भीष्म पितामह"

५. संपत्ती, सत्ता, अधिकार आणि चुकीच्या लोकांचा आधार यांचा गैरवापर शेवटी पूर्ण विनाशाला कारणीभूत ठरतो "दुर्योधन"

६. सत्तेची दोरी कधीही अंधालाम्हणजे स्वार्थ, संपत्ती, गर्व, मोह किंवा कामाने अंध झालेल्या व्यक्तीसहातात देऊ नका; कारण त्याचा शेवट नेहमी विनाशातच होतो "धृतराष्ट्र"

७. ज्ञान जर सद्ज्ञानासोबत असेल तर विजय निश्चित आहे "अर्जुन"

८. फसवणूक करून प्रत्येक वेळी यश मिळत नाही "शकुनी"

९. जर तुम्ही नीतिमत्ता, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यपालन यांना सर्वोच्च स्थान दिले, तर जगातील कोणतीही शक्ती तुम्हाला पराभूत करू शकत नाही "युधिष्ठिर"

१०. आणि शेवटी

जर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून सत्य, धर्म आणि पूर्ण शरणागती स्वीकारली, तर मी स्वतः उभा राहून तुमची रक्षा करतो.

"श्रीकृष्ण"

**सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामय :**

# ॐ नमः शिवाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवार हा भगवान महादेवाला (शिवजी) समर्पित पवित्र वार आहे. या दिवशी महादेवाची पूजा, रुद्राभिषेक आणि व्रत केल्याने सुख, समृद्धी आणि इच्छित फळ मिळते असे मानले जाते. सोमवारी विशेषतः श्रावण महिन्यात 'शिवामूठ' (विविध धान्य अर्पण) आणि शिवपिंडीवर बेलपत्र, दूध व गंगाजल अर्पण करणे शुभ मानले जाते.

**सोमवार (महादेव) पूजेची माहिती**

**महत्त्व :** सोमवारी भगवान शिव प्रसन्न राहतात. यामुळे मानसिक शांती, आरोग्यात सुधारणा आणि वैवाहिक



जीवनातील अडचणी दूर होतात.

**पूजा विधी :** सकाळी लवकर उठून स्नान करावे, महादेवाची पूजा करावी, पिंडीवर दूध, पाणी, बेलपत्र, चंदन, अक्षता (तांदूळ) आणि फुले अर्पण करावीत.

**व्रत/उपवास :** सोमवारचे व्रत मनोकामना पूर्ण करण्यासाठी, विवाह जुळण्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी केले जाते.

**मंत्र :** 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप करणे अत्यंत फलदायी आहे.

**कहाणी :** सोमवारच्या व्रताची कहाणी वाचल्याने व्रताचे पूर्ण फळ मिळते.

**काही महत्त्वाचे नियम**

- महादेवाला केतकीचे फूल अर्पण करू नये.
- शिवलिंगाला नेहमी पूर्व किंवा उत्तर दिशेला तोंड करून पाणी अर्पण करावे.

# नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्व साधनांत श्रेष्ठ साधन नामस्मरणच आहे. पण त्याचे महत्त्व कळत नाही. ते कळायला खरोखर भगवत्कृपाच पाहिजे. आपल्या शरीरात मुख्य जसे हृदय, आणि बाकीचे अवयव गौण आहेत, तसे परमार्थात मुख्य साधन नामस्मरण हे आहे आणि दुसरी साधने गौण आहेत. नाम हे मंगलांत मंगल आणि अत्यंत पवित्र आहे. आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे हे पक्के लक्षात ठेवा.

योगात, योग करीपर्यंतच समाधान असते; पण नामस्मरणाच्या अनुसंधानात सतत समाधान असते. स्वतः निर्गुण झाल्याशिवाय निर्गुण उपासना होत नाही. तेज दिसणे, नाद ऐकणे, या सर्व गोष्टी गुणातच नाही का आल्या? निर्गुण व्हायला देहबुद्धी सुटायला पाहिजे. सर्वव्यापी परमेश्वराला सर्वांभूतीं पाहणे ही निर्गुण उपासनाच होय. योग नामस्मरणाला पोषक तितकाच करावा; केवळ त्यालाच प्राधान्य देऊ नये. योग नामस्मरणाला पोषक आहे, पण नामस्मरण योगाच्या पलीकडे आहे; म्हणून नामस्मरणात योग येतो, योगात नामस्मरण येत नाही. सर्व साधनांचा अंत नामस्मरणात आहे. नामाचे साधन हे जलद गाडीप्रमाणे आहे. रंग दिसणे, प्रकाश दिसणे, आवाज ऐकू येणे ही मधली स्टेशने सोडून नाम एकदम भगवंतापर्यंत नेऊन पोहोचवते. इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल, पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल, पण जे साधेल ते कायमचे साधेल, कारण नामाने



मुळापासून सुधारणा होते. नामस्मरण हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग होय. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वतःला विसरेल. तुकारामबुवांची वाचा त्यांना अनावर झाली, ती सारखी नाम घेऊ लागली; याचा अर्थ असा की, त्यांच्या कल्पनेच्या बाहेर नाम येऊ लागले. गाडी उताराला लागली की जशी अतिवेगात येते आणि आवरत नाही, तसे हे आहे. आपल्या शक्तीच्या बाहेर कार्य होणे ही भगवंताची कृपा होय.

चार माणसे होती, त्या सर्वांना एकच रोग झाला होता. पण त्यांची सांपत्तिक स्थिती सारखी नव्हती. वैद्याने त्यांपैकी अगदी गरीब माणसाला एक औषध तुळशीच्या रसात घ्यायला सांगितले, त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध मधात घ्यायला सांगितले, त्याच्याहीपेक्षा पैसेवाल्याला तेच औषध केशरात घ्यायला सांगितले, आणि सर्वांत श्रीमंत होता त्याला तेच औषध कस्तुरीत घ्यायला सांगितले. त्याचप्रमाणे, ज्याचा जसा अधिकार तसे त्याने नाम घ्यावे. नाम नुसते तोंडाने घ्यावे, नाम श्रद्धेने घ्यावे, नाम वृत्ती सांभाळून घ्यावे, नामाशिवाय जगात दुसरे सत्य नाही, अशा दृढ भावनेने घ्यावे; सर्वांना फळ सारखेच मिळेल.

# वर्षातील पहिले चंद्रग्रहण : आत्मशुद्धी आणि अंतर्मुखतेचा क्षण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळवार, दि. ३ मार्च रोजी वर्षातील पहिले चंद्रग्रहण येत आहे. भारतीय संस्कृतीत चंद्रग्रहण हे केवळ खगोलशास्त्रीय घटना नसून, आध्यात्मिक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. आकाशातील हा अद्भूत योग मानवाच्या अंतर्मनालाही स्पर्श करून जातो.

हिंदू धर्मग्रंथांनुसार समुद्रमंथनाच्या वेळी अमृतपान केलेल्या राहू-केतूचा प्रसंग चंद्रग्रहणाशी जोडला जातो. राहू आणि केतू यांनी अमृत घेतल्याचे उघड झाल्यावर भगवान विष्णू यांनी त्यांचा मस्तक आणि धड वेगळे केले. तेव्हापासून राहू आणि केतू सूर्य व चंद्राला ग्रासतात, अशी पौराणिक कथा सांगितली जाते. या कथेतून एक महत्त्वाचा संदेश मिळतो. अहंकार, लोभ आणि असत्याचा शेवटी नाश होतो. सत्य आणि धर्माचीच विजयश्री असते.

चंद्र हा मनाचा अधिपती मानला जातो. म्हणूनच चंद्रग्रहणाचा परिणाम मनःस्थितीवर होतो, अशी श्रद्धा आहे. मनातील नकारात्मक विचार, अस्थिरता, असूया किंवा राग या भावना या काळात प्रकर्षाने जाणवू शकतात. त्यामुळे ग्रहणकाळ हा



आत्मपरीक्षणाचा, अंतर्मुख होण्याचा आणि आत्मशुद्धीचा काळ मानला जातो. बाह्य प्रकाश काही काळ मंदावतो; पण अंतःकरणातील प्रकाश प्रज्वलित करण्याची हीच खरी संधी असते.

मंगळवार हा दिवस पराक्रम, शक्ती आणि भक्तीचा मानला जातो. या दिवशी श्री हनुमान यांचे पूजन विशेष फलदायी मानले जाते. चंद्रग्रहण मंगळवारी आल्याने आध्यात्मिक दृष्ट्या हा योग अधिक प्रभावी समजला जातो. हनुमान चालीसा पठण, सुंदरकांड वाचन किंवा रामनाम जप केल्यास मानसिक स्थैर्य लाभते, अशी श्रद्धा आहे. संकटांचे निवारण आणि भीतीचा नाश करण्यासाठी या दिवशी केलेली प्रार्थना अधिक सामर्थ्यशाली ठरते.

ग्रहणकाळात मंत्रजप, ध्यान, दान आणि स्नान यांना विशेष महत्त्व आहे. "ॐ नमः शिवाय", "ॐ चंद्राय नमः" किंवा आपल्या इष्टदेवतेचा जप करणे अत्यंत शुभ मानले जाते. ग्रहण संपल्यानंतर शुद्ध पाण्याने स्नान करून घरातील देवघर स्वच्छ करावे. शक्य असल्यास अन्नदान, वस्त्रदान किंवा गरजूंना मदत करावी. दानधर्मामुळे ग्रहणकाळातील नकारात्मकता दूर होते, असे मानले जाते.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, चंद्रग्रहण ही पृथ्वी, सूर्य आणि चंद्र यांच्या विशिष्ट स्थितीमुळे घडणारी नैसर्गिक घटना आहे. तरीही भारतीय संस्कृतीत विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय दिसून येतो. ग्रहणकाळात उपवास ठेवणे, जप करणे किंवा मौन पाळणे या गोष्टी आरोग्यदायी आणि मनःशांती देणाऱ्या ठरतात. त्यामुळे या परंपरांचा अर्थ अंधश्रद्धा नसून आत्मशुद्धीचा मार्ग म्हणून पाहिला पाहिजे.

चंद्रग्रहण आपल्याला जीवनातील एक गूढ संदेश देते. प्रकाश आणि अंधार हे दोन्ही जीवनाचा भाग आहेत. काही क्षणांसाठी चंद्र झाकोळला जातो. मात्र, तो कायमचा नाहीसा होत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात अडचणी, संकटे, दुःख येतात. मात्र, संयम, श्रद्धा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर पुन्हा प्रकाश उजाडतोच. ग्रहण हा क्षणिक अंधार असतो. मात्र, त्यानंतर येणारा प्रकाश अधिक तेजस्वी वाटतो.

या वर्षातील पहिल्या चंद्रग्रहणाच्या निमित्ताने प्रत्येकाने थोडा वेळ स्वतःसाठी काढावा. मनातील कटुता, मत्सर, राग या भावनांचा त्याग करून प्रेम, करुणा आणि क्षमाशीलता अंगीकारावी. कुटुंबासोबत प्रार्थना करावी, देवाचे स्मरण करावे आणि जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प करावा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)